# डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम : वाचन प्रेरणा दिन साजरा

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयत भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस १५ ऑक्टोबर हा वाचना प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या 'अग्निपंख', मिशन २०२०,स्वप्नातील भारत अशा प्रेरणादायी ग्रंथाचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या मनावर वाचनाचे महत्व बिंबविण्यासाठी 'ग्रंथ प्रदर्शन' आयोजित केले गेले. विद्यार्थ्यांना ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या विविध विषयांच्या ग्रंथांची माहिती व्हावी व वाचनासाठी ते उद्युक्त व्हावेत असे प्रयोजन ग्रंथ प्रदर्शनाचे होते. ग्रंथपाल डॉ. एम.डी. वराडे व ग्रंथालय परिचर श्री.एन.जे.बडगुजर यांनी ग्रंथप्रदर्शनासाठी बहुमोल योगदान दिले.

श्रीमती कामिनी तिवारी यांनी डॉ.अब्दुल कलम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाचे उदघाटन केले. त्यांनी स्वलिखित कविता सांगून संत रहिमदास यांच्या दोह्यांचे विवरण केले.डॉ.रुपाली तायडे आत्मविश्वास व प्रगल्भता सांगणाऱ्या परिच्छेदाचे वाचन केले. डॉ.गीता पाटील यांनी ग्रामीण साहित्याचे विवेचन करणारा परिच्छेद वाचला. श्रीमती. हेमलता कोटेचा यांनी 'ई- बँकिंग' ची माहिती सांगणाऱ्या लेखाचे वाचन केले. डॉ. मनोज निकाळजे यांनी ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथाविषयी श्रोत्यांना माहिती दिली. श्री.नितेश सावदेकर यांनी 'अग्निपंख' मधील स्फूर्तीदायक भागांचे विवेचन केले.श्रीमती रत्ना जवरास यांनी 'वाणी-दोष काढून टाकणे आवश्यक असल्याचे दर्शविणारा परिच्छेद वाचला प्राध्यापकांच्या वाचन कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांसाठी महान व्यक्तींच्या मौलिक विचारांचे सामुहिक वाचन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात ४९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. कु.रुपाली माळी, कु.रेणुका पांचाळ, स्वप्नील वंजारी, अमर पवार या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, ए.पी.जे.अब्दुल कलम व सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याविषयी माहिती सांगणाऱ्या परिच्छेदांचे वाचन केले.

डॉ.रुपेश मोरे यांनी विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवन व शैक्षणिक प्रगती याबद्दल प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन केले.

वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात सर्व प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सांस्कृतिक मंडळातर्फे करण्यात आलेले होते. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी, उपप्राचार्य डी.एस.पाटील डॉ.मधू खराटे यांनी प्रोत्साहन दिले. सर्व प्राध्यापक, विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.